# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत राबविलेल्या कार्यक्रमाची पाहणी



मौजे सिरेगाव, ता. गंगापूर, उपविभाग वैजापूर, जि. औरंगाबाद येथे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियानांतर्गत एकाच गावामध्ये १ टन गव्हाचे बियाणे वापरून बियाणे बदल मोठ्या प्रमाणात करण्यात आले. कृषी पर्यवेक्षक श्री. सुनिल वझे यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथून सदरचे त्र्यंबक (एन. आय. ए. डब्ल्यू.-३०) या वाणाचे बियाणे उपलब्ध करून घेतले. चालू वर्ष हे 'बीजप्रक्रिया वर्ष' असल्याने सर्व बियाणे प्रक्रिया करूनच पेरण्यात आले. सदरच्या गहू पिकाची पाहणी कृषी व जलसंधारणमंत्री मा. ना. श्री. बाळासाहेब थोरात यांनी नुकतीच करून समाधान व्यक्त केले. यावेळी औरंगाबादचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. डी. जी. काळाणे वैजापूरचे उपविभागीय कृषी अधिकारी श्री. डी. आय. गायकवाड गंगापूरचे ता. कृ. अ. श्री. प्रबोध चव्हाण व मं. कृ. अ. श्री. धनराज बनसोड, इतर अधिकारी, कर्मचारी तसेच तृणधान्य विकास शेतीशाळेचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.